# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १३८-२२** **दिनांक :- १३/०५/२०२२**

## घरफोडी चोरी करणारे चोरास अटक करुन एकूण ३ गुन्हे घडकीस आणन्यात तुळींज गुन्हेप्रकटीकरण पथकास यश

तुळींज पोलीस ठाण्याचे हददीत दिनांक ०८/०५/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजेपासुन ते दिनांक ०९/०५/२०२२ रोजी सकाळी ०८:३० वाजताचे दरम्यान जुना सुशिला निवास, पहिला मजला, साई प्लाझा बार समोर, तुळींज रोड, नालासोपारा पुर्व येथून फिर्यादी नामे श्री. रोनक नंदु, व्यवसाय- व्यापार, राहणार- रुम नंबर- ००५, सी विंग, तळमजला, दामोदर नगर, वेदांत हॉल समोर, तुळींज रोड, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांचे नंदु गृह लघुउदयोगाच्या मुख्य दरवाज्याचा कोयंडा अज्ञात इसमाने तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी यांच्या संमतीशिवाय एकुण २०,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता चोरी करुन नेल्याने तुळींज पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर I २८९/२०२२ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासात आरोपी रोहीत रमेश कन्सारा,वय ३० वर्षे रा. विठठल कृष्णा निवास, सर्वेदय वसाहत, टाकीरोड नालासोपारा पुर्व. यास ताब्यात घेऊन त्याचे कडून गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच त्याचे कडून तुळींज पोलीस ठाणेचे इतर ३ गुन्हे उघडकीस आणून गुन्हयातील गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे

| अ.क्र. | गुन्हा रजि.नंबर व कलम |
|---|---|
| १) | तुळींज पोस्टे गुन्हा रजि.नंबर I २८९/२०२२ भादविसक ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| २) | तुळींज पोस्टे गुन्हा रजि.नंबर I ९१/२०२२ भादविसक ४५७,३८० प्रमाणे |
| ३) | तुळींज पोस्टे गुन्हा रजि.नंबर I २९३/२०२२ भादविक ४५४,४५७,३८० प्रमाणे |

सदरची कामगीरी श्री.संजयकुमार पाटील, पो.उप आयुक्त ,परिमंडळ -२, श्री.पंकज शिरसाट, सहा.पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक अनंत धांदोरे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पो.निरी. एम.डी.म्हात्रे, शिवानंद सुतनासे, पोहवा.अनिल शिंदे, प्आनंद मोरे, पो.ना./ उमेश वरठा, पो.शि./अश्पाक जामदार, इस्माईल छपरीबन, सुखराम गडाख, विनायक राऊत यांनी केलेली आहे.

----ooo----